## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१६०/२०१० मधील
## निशाणी क्र.१६६ वर आदेश

**CNRNO.MHLA110006952010.**

०१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

०२. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी अर्जामध्ये नमुद साक्षीदाराला साक्षीसमन्स काढण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जाला वादींनी म्हणणे दाखल करुन तिव्र विरोध दर्शविलेला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादींनी केवळ प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्ज चालु शकत नाही. सदर प्रकरणातील दावा हा मिळकतींच्या वाटपाकरिता दाखल असुन पक्षकारांमध्ये नातेसंबंधाबाबत महत्वाचे वाद आहेत. त्यामुळे सदर प्रकरणातील दाव्यातील व कैफियतमधील कथन विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी साक्षीदारांची यादी दाखल केलेली नसली तरी नैसर्गिक न्यायाच्या दृष्टिने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना बचावाच्या अनुषंगाने पुरावा दाखल करण्यास संधी देणे न्यायोचित होणार आहे. तसेच अर्जात नमुद साक्षीदार साक्षीसाठी हजर झाल्यानंतर त्याबाबत बाजु मांडण्याची वादींना संधी मिळणार आहे. सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. नि.क्र.१६६ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ कडुन नियमाप्रमाणे साक्ष भत्ता स्वीकारुन अर्जात नमुद साक्षीदाराला साक्षीसाठी हजर राहण्याकरिता साक्षीसमन्स काढावे.

Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2021.02.10 16:39:43 +0530

दि.१०.०२.२०२१.

(शिवकांत म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर निलंगा.